अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई—३०
दुरध्वनी क्र.— ०२२—२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :— १७/०१/२०२५

## —: प्रेसनोट :—

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | ०४/२०२५ |
| कलम | कलम ७ (अ) भ.प्र.अधिनियम १९८८. |
| आरोपी लोकसेवक | बॉबी किशोर सेनेकर, प्रोजेक्ट मॅनेजर, ओम सिध्दीविनायक कंपनी, माधववाडी, दादर (पू), मुंबई |
| लाचेची मागणी | रू. १५,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | रु. १५,०००/- |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार हे खाजगी कंपनीमध्ये प्रोजेक्ट कोऑर्डिनेटर म्हणून कामास आहेत. त्यांच्या कंपनीमार्फत लायसन्स व लायझनींगचे काम केले जाते. तक्रारदार यांचे कंपनीमार्फत दिनांक ०३/०५/२०२३ रोजी एका फॅमिली रेस्टॉरन्टचे पी.एन.जी. कनेक्शन, पी.एन.जी. रजिस्ट्रेशन, मीटर इन्स्टॉलेशन इ. चे काम घेतलेले होते. सदर रेस्टॉरन्टसाठी गॅस लाईन कनेक्शनसाठी खोदकाम करून लाईन टाकून देण्यासाठी बी.एम.सी. अधिकाऱ्यांना पैसे द्यावे लागतील, असे सांगून खाजगी इसम बॉबी किशोर सेनेकर यांनी फिर्यादी यांचेकडे रूपये १५,०००/- इतकी लाचेच्या रक्कमेची मागणी केली. परंतु तक्रारदार यांना खाजगी इसमास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाप्रवि कार्यालयात दिनांक १८/१०/२०२४ रोजी समक्ष हजर राहून तक्रार अर्ज केला.<br>प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २१/१०/२०२४ व २२/१०/२०२४ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान खाजगी इसम बॉबी सेनेकर याने तक्रारदार यांच्याकडे त्यांच्या कामाकरीता लोकसेवकावर प्रभाव पाडण्यासाठी बेकायदेशीर मार्गाने रू. १५,०००/- इतक्या लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार दिनांक १६/०१/२०२५ रोजीच्या करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान खाजगी इसम बॉबी सेनेकर यांना तक्रारदार यांचेकडून लाचेची रक्कम रू. १५,०००/- स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. म्हणुन भ्र.प्र.अधि. १९८८ चे कलम ७ (अ) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

तपास अधिकारी:- श्री नारायण सरोदे, पोलीस निरीक्षक पर्यवेक्षक अधिकारी:- श्री. निरज उबाळे, सहाय्यक पोलीस आयुक्त
मार्गदर्शन अधिकारी :- श्री. संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल तुकाराम घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र गणपत सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( मनिषा झेंडे )
सहाय्यक पोलीस आयुक्त,(प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**
**टोल फ्री** क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
**वेबसाईट** :— acbmaharashtra.gov.in, **ईमेल** :— acbwebmail@mahapolice.gov.in
**ईमेल** :— addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
**फेसबुक** :— www.facebook.com - Maharashtra ACB **मोबाईल ॲप** :— www.acbmaharashtra.net